## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

## दिनांक ०५/१२/२०२० (शनिवार)

---

### जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न

पोलीस ठाणे रामटेक :– अंतर्गत फिर्यादी राम सुरेश धुपटे, वय २४ वर्षे, रा. वार्ड क्र. ०४, नगरधन यांचेशी दिनांक ०४/१२/२०२० रोजी दुपारी पत्ते खेळण्याच्या कारणाने वादविवाद घालुन रामटेक ते नगरधन रोडवर ०७ किमी अंतरावर सायंकाळी २०.०० वा. ते २०.४५ वा. दरम्यान १) आकाश रमेश बंदाडे, रा. नगरधन याने फिर्यादी यांचेवर धारदार शस्त्राने वार करताच त्याचे सोबत असलेले २) अजय रमेश बंदाडे, ३) विजय रमेश बंदाडे, ४) राजेन उर्फ टायगर आरेवा, ५) महेंद्र उर्फ टॉमन बिरनवार, ६) अश्वीन मोहनकार, ७) मनिष मोहनकार, सर्व रा. नगरधन, ८) आशिष शेंदरे, रा. बेलडोंगरी माईन्स, ९) कालु, रा. रामटेक यांनी सुद्धा फिर्यादीस जिवानिशी ठार मारण्याच्या उद्देशाने कोयता, चाकु, गुप्ती, लोखंडी रॉड या धारदार शस्त्रांनी वार करुन गंभीर जखमी केले. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे जबानीवरुन आणि वैद्यकीय अहवालावरुन पोलीस ठाणे रामटेक येथे कलम ३०७, १४३, १४७, १४८, १४९ भादंवि सहकलम ४, २५ शस्त्र अधिनियमान्वये नमुद क्र. ०१ ते ०९ इसमांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक श्री दिलीप ठाकुर हे करीत आहेत.

### अंमली पदार्थ (गांज्या) विक्रेत्यास अटक, स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

पोलीस ठाणे मौदा :– नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला यांचे निर्देशानुसार जिल्ह्यात अंमली पदार्थ विरुद्ध विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने दिनांक ०४/१२/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे मौदा हद्दीत गस्तीवर असता मौजा तारसा, आझाद चौक येथिल मदन दौलत हटवार हा आपले राहते घरी अंमली पदार्थ (गांज्या) बाळगुन लोकांना विक्री करीत असल्याबाबत गोपनिय सुत्रांकडुन खात्रीशीर बातमी मिळाली. त्यानुसार सदरची बातमी वरिष्ठांना अवगत करुन त्याचे घरी जावुन निवासस्थानाची बारकाईने घरझडती घेण्यात आली. दरम्यान बेडरुममधील लाकडी पलंगाचे खाली एका पांढऱ्या रंगाच्या पिशवीमध्ये ६८३ ग्रॅम अंमली पदार्थ (ओलसर गांज्या) किंमत ५२१० रु. चा मिळून आला. सदरचे अंमली पदार्थ मदन दौलत हटवार, वय ४८ वर्षे, रा. तारसा याचे कडुन कायदेशिररित्या हस्तगत करण्यात आले. सदर प्रकरणी त्याचे विरुद्ध पोलीस ठाणे मौदा येथे अंमली औषधीद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ चे कलम २० अन्वये गुन्हा नोंद करुन त्यास अटक करण्यात आली. पुढील तपास सुरु आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपनिरीक्षक सचिन मत्ते, सहा. पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मीप्रसाद दुबे, पोलीस हवालदार विनोद काळे, ज्ञानेश्वर राऊत, पोलीस नाईक दिनेश आधापुरे, शैलेश यादव, सत्यशिल कोठारे, अरविंद भगत, पोलीस शिपाई विपिन गायधने, महिला पोलीस शिपाई हेमलता झाडे यांनी यशस्वी केली.

## घरफोडी

पोलीस ठाणे सावनेर :— अंतर्गत फिर्यादी सौ. संगिता कचरूजी छत्रे, वय ४० वर्षे, रा. सटवा माता मंदिर जवळ, वार्ड क्र. ०५, सावनेर या नातेवाईक मरण पावल्याने आपले घराला कुलुप लावुन सर्व कुटूंबियांसह दिनांक ३०/११/२०२० ते ०४/१२/२०२० चे २१.०० वा. दरम्यान हिंगणा येथे गेल्या असता कोणीतरी अज्ञात चोरांनी घराचे दाराला लागलेले कुलुप कडीकोंड्यासह तोडुन घरात प्रवेश केला आणि लोंखंडी कपाटातील सोन्या—चांदीचे दागिने किंमत २,२६,०००/— रु. व नगदी २०,०००/— रु. असा एकुण २,४६,०००/— रु. चा ऐवज चोरुन नेला. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती कविता सावळा या करीत असुन आरोपींचा शोध सुरु आहे.

पोलीस ठाणे रामटेक :— अंतर्गत दिनांक ०१/१२/२०२० चे १२.०० वा. ते ०३/१२/२०२० चे ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी रोनीत अशोक गुरव, वय २८ वर्षे, रा. रामाळेश्वर वार्ड, रामटेक यांचे घराचे बेडरुममधील खुल्या लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने किंमत ७७,७००/— रु. चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री राऊत हे करीत असुन आरोपीचा शोध सुरु आहे.

## चोरी

पोलीस ठाणे सावनेर :— अंतर्गत दिनांक ०४/१२/२०२० चे १७.३० वा. ते १८.०० वा. दरम्यान फिर्यादी लक्ष्मण रूपचंद मरस्कोल्हे, वय ६० वर्षे, रा. रामटेक यांनी त्यांची मोटार सायकल क्र. एमएच ४०/एबी ७१४९ किंमत १३,०००/— रु. ची रामटेक येथिल मच्छी मार्केट, आरती फोटो स्टुडीओ समोर उभी करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरांनी त्यांची मोटार सायकल चोरुन नेली. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री राऊत हे करीत असुन आरोपीचा शोध सुरु आहे.

## अपघातात मृत्यु

१) पोलीस ठाणे भिवापूर :— अंतर्गत दिनांक ०४/१२/२०२० रोजी ०९.३० वा. दरम्यान मौजा मानोरा फाटा शिवारात मोटार सायकल क्र. एमएच ४०/बीएम ५७९१ चे चालक मारोती महादेव रंधई, वय २१ वर्षे हे आपले मोटार सायकलने जात असताना त्यांना कोणत्या तरी अज्ञात वाहण चालकाने आपले वाहण भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन धडक मारल्याने गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावले. सदर प्रकरणी पिकेश्वर हरीचंद्र घोडमारे, वय २७ वर्षे, रा. लोणारा, ता. भिवापूर यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे भिवापूर येथे अज्ञात वाहण चालकाविरुद्ध कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादंवी सहकलम १३४, १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री चंगोले हे करीत असुन अज्ञात वाहण चालकाचा शोध सुरु आहे.